ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - I Marathi Part - II January - March - 2019

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"AJANTA"**. Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

**Published by :**

Ajanta Prakashan, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

Cell No. : 9579260877, 9822620877, Ph.No. : (0240) 2400877

E-mail : ajanta1977@gmail.com, www.ajantaprakashan.com

**AJANTA - ISSN 2277 - 5730 - Impact Factor - 5.5** (www.sjifactor.com)

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA





Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - II

Ajanta Prakashan

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

# EDITORIAL BOARD

**Dr. P. Vitthal**
School of Language and Literature
Marathi Dept. Swami Ramanand
Teerth Marathwada University, Nanded.

**Dr. Jagdish R. Baheti**
H.O.D. S. N. J. B. College of Pharmacy,
Meminagar, A/P. Tal Chandwad, Dist. Nashik.

**Dr. Sadique Razaque**
Univ. Department of Psychology,
Vinoba Bhave University,
Hazaribagh, Jharkhand.

**Prof. Ram Nandan Singh**
Dept. of Buddhist Studies University of Jammu.

**Dr. A. D. Kumbhar**
Principal,
Sadashivrao Mandlik Mahavidyalya,
Murgud, Tal-kagal, Dist-Kolhapur.

**Dr. T. M. Patil**
Sadashivrao Mandlik Mahavidyalya,
Murgud, Tal-kagal, Dist-Kolhapur.

**Dr. A. D. Joshi**
Sadashivrao Mandlik Mahavidyalya,
Murgud, Tal-kagal, Dist-Kolhapur.

**Dr. U. R. Shinde**
Sadashivrao Mandlik Mahavidyalya,
Murgud, Tal-kagal, Dist-Kolhapur.

**Dr. S. M. Hodage**
Sadashivrao Mandlik Mahavidyalya,
Murgud, Tal-kagal, Dist-Kolhapur.

PUBLISHED BY

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | सांगली जिल्ह्यातील दारिद्रयाचा अभ्यास<br>**प्रा. डॉ. के. पी. वाघमारे** | १-७ |
| २ | बहुविधतेमध्ये एकता निर्माण करणारी भारतीय संस्कृती<br>**प्रा. कदम संभाजी धोंडीराम** | ८-११ |
| ३ | मुस्लिम संत कवितेतील संस्कृती<br>**डॉ. सुकुमार दादू आवळे** | १२-१४ |
| ४ | कोकणातील, राजापूर शहर आणि तालुका परिसरातील पर्यटन स्थळांची ओळख<br>**प्रा. नितीन तुकाराम जाधव** | १५-२२ |
| ५ | बहुसंस्कृती वाद व पर्यटन व्यवसाय - एक अभ्यास<br>**प्रा. पी. आर. फराकटे** | २३-२८ |
| ६ | बहुलसंस्कृतीवाद आणि कुटूबंसंस्थेचे बदलते स्वरुप<br>**प्रा. पांडुरंग सखाराम सारंग** | २९-३२ |
| ७ | मराठी नाटकातील आशयाच्या वर्गीकरणावर बहुसंस्कृतीवादाचा प्रभाव<br>**श्री सुनिल पांडूरंग पालकर** | ३३-३६ |
| ८ | जागतिकीरण आणि हरितक्रांतीचे अर्थशास्त्रातील अलिकडील प्रवाह<br>**प्रा. आर. एस. माने** | ३७-४२ |
| ९ | बहुसंस्कृतीवाद आणि राष्ट्रवाद<br>**प्रिया गणपत पोवार** | ४३-४८ |
| १० | नागरिकत्व आणि बहुलसंस्कृतीवाद<br>**प्रा. एस. एस. संघराज** | ४९-५० |
| ११ | यशवंतराव चव्हाण यांची कृषी औद्योगिक समाजरचना आणि राजकारण<br>**प्रा. व्ही. एस. पानस्कर** | ५१-५७ |
| १२ | बहुसांस्कृतिकतावाद आणि मराठी भाषा<br>**सहा. प्रा. भीमराव जोतिबा शिंदे** | ५८-६३ |
| १३ | माहिती संप्रेषण एक बहुभाषिक प्रक्रिया<br>**प्रा. तानाजी हरी सातपुते** | ६४-६६ |

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | महाष्ट्रातील भटक्या व विमुक्तांचे आर्थिक आणि सामाजिक विकासातील स्थान<br>**Mr. Subhash R. Bhosale** | ६७-७४ |
| १५ | बहुसंस्कृतीवाद आणि भारत<br>**प्रा. जयसिंग मारुती कांबळे** | ७५-७९ |
| १६ | मराठी नाटकातील आशयाच्या वर्गीकरणावर बहुसंस्कृतीवादाचा प्रभाव<br>**श्री सुनिल पांडुरंग पालकर** | ८०-८३ |
| १७ | साथी एस. एम. जोशी : विचार व कर्तृत्व<br>**प्रा. पौर्णिका सरदेसाई** | ८४-८९ |
| १८ | महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील बहुसांस्कृतिकता व भाषा (निपाणी परिसराच्या अनुषंगाने)<br>**प्रा. डॉ. संजय दशरथ पाटील** | ९०-९२ |
| १९ | काळानुसार बदलणारी खेडी<br>**प्रा. शहाजी धोंडीराम वारके** | ९३-९५ |
| २० | साहित्य : एक सामाजिक संस्था<br>**डॉ. सागर अशोक लटके** | ९६-९७ |
| २१ | भारतीय कृषी व्यवस्थेतील आधुनिक आर्थिक प्रवाह<br>**डॉ. शुभांगी माने** | ९८-१०१ |
| २२ | लोकसाहित्याच्या आधुनिक अभ्यास पध्दती<br>**प्रा. बी. के. पाटील** | १०२-१०६ |
| २३ | बहुसंस्कृतीवाद आणि राष्ट्रवाद<br>**सुप्रिया नितीन भोसले**<br>**संगिता गणपती मुसळे** | १०७-११० |
| २४ | ग्रामीण कष्टकरी स्त्रीयांचे चित्रण<br>**विनायक विलास सरदेसाई** | १११-११४ |
| २५ | भारतीय आदिवासींवरील बहुसंस्कृतीवादाचा प्रभाव (१९५० पासून)<br>**प्रा. विठ्ठल आवबा कांबळे** | ११५-११९ |

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)**

# १७. साथी एस. एम. जोशी : विचार व कर्तृत्व

**प्रा. पौर्णिका सरदेसाई**
एस. पी. हेगशेट्ये कला, वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, रत्नागिरी.

थोर स्वातंत्र्य सेनानी संयुक्त महाराष्ट्राचे शिल्पकार, सामाजिक समतेच्या लढ्यातील ज्येष्ठ नेते, देशातील असंख्य समतावादी नेत्यांचा आदर्श म्हणजे साथी एस. एम.जोशी. त्यांचे नाव श्रीधर महादेव जोशी.गोळप हे त्यांचे मुळ गाव. त्यांचा जन्म १२ नोव्हेंबर १९०४ रोजी पुणे जिल्ह्यातील जुन्नर येथे झाला. वडीलांच्या मृत्यूनंतर हालाखीच्या परिस्थितीमुळे बालपण कष्टात गेले. परिस्थितीशी झगडत त्यांनी शिक्षण पूर्ण केले. विद्यार्थी दशेपासूनच त्यांच्या मनात देशभक्तीचा उगम झाला. लो. टिळक, म. गांधी यांच्याबद्दल आदर निर्माण झाला. तसा क्रांतीकाऱ्यांबद्दल त्यांना आदर वाटत होता.

**समाजवादी विचारांबद्दल आकर्षण**

हिंदुत्ववादी विचारांबद्दल आकर्षण वाटणाऱ्या एस. एम. यांच्या जीवनाला युथ लीगमध्ये काम करण्यास सुरुवात केल्यापासून आमुलाग्र वळण मिळाले. डॉ. आंबेडकरांनी केलेल्या महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेशाने प्रभावित होवून युथ लिगच्या सहकाऱ्यांनी अस्पृश्य बांधवांसह पुण्याला पर्वती सत्याग्रह केला. येरवडा तुरुंगात असताना एस. एम.यांनी मानवेंद्रनाथ रॉय यांचे "टाक्स बिफोर अस" हे पुस्तक वाचले.त्यामुळे त्यांची समाजवादी भुमिका अधिक दृढ झाली. त्यांचे सहकारी ना. ग. गोरे, जयप्रकाश नारायण, युसुफ मेहरअली, अच्युतराव पटवर्धन आदी मार्क्सच्या तत्वज्ञानाने प्रभावित झालेल्या तरुणांनी काँग्रेस समाजवादी पक्षाची दि. २१ ऑक्टोबर १९३४ ला मुंबईत स्थापना केली.मार्क्सच्या तत्वज्ञानाने प्रभावित झालेल्या या सर्वांना स्वातंत्र्य चळवळीत समाजवादी आशय झालाच पाहिजे असे उत्कटतेने वाटत होते.स्वातंत्र्यानंतर भारताची जडणघडण ही आर्थिक व सामाजिक न्याय व समता यावर आधारित समाजरचना असली पाहिजे. या ध्येयाने प्रेरित होवून १९३६ मध्ये काँग्रेस सोशालीस्ट पार्टीच्या स्थापनेत सहभागी झाले.जून १९४१ मध्ये राष्ट्रसेवा दलाची स्थापना होवून एस. एम.जोशी हे दलप्रमुख झाले.राष्ट्रसेवा दलाची जबाबदारी घेताना स्वातंत्र्य चळवळीत समर्पण करण्याची प्रेरणा तरुणांना देण्याचा मनाशी निर्धार केला.

**थोर स्वातंत्र्यसेनानी**

१९३० साली गांधीजींनी सुरु केलेल्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत एस. एम.नी स्वतःला झोकून दिले. स्वातंत्र्याची मागणी करणारी प्रक्षोभक भाषणे केल्याबद्दल एस. एम.आणि वामन परांजपे यांना सक्त मजुरीची शिक्षा झाली. आपल्या आत्मकथेत एस. एम.यांनी सक्त मजुरी मस्त असे कारवासाचे वर्णन केले.ते म्हणतात," अशा प्रकारे तुरुंगात मी न्हावी झालो, भंगीही झालो. म्हणून मी नेहमी म्हणतो की, तुरुंगात गेल्यावर मी पूर्ण नागरिक झालो. पूर्ण या

अर्थाने की देशातील काही माणसांना त्यांच्या कामावरुन कमी लेखण्यात येते ते बरोबर नाही. हे तुरुंगवासाने माझ्यावर बिंबवले."

एस.एम.म्हणतात,"म.गांधीजी खादीचा प्रसार करीत ¦यावेळी तो मला रुचत नसे. अलीकडे मला त्यांच्या म्हणण्याचा अर्थ अधिक चांगला समजू लागला आहे. स्वराज्य आले तरी आम्ही खेड्यापाड्यातील दिनदलितांचे दारिद्र्य आणि अवहेलना संपवू शकलो नाही.फ आजं मला वाटते की, मी जेव्हा खादी विकत होतो तेव्हा कुठल्या तरी दुरच्या खेड्यातील एखादी विधवा किंवा तलाख पिडीत मुस्लिम महिला चरख्यावर सूत काढून त्यातून मिळणाऱ्या ५-६ रुपयांवर आपला प्रपंच चालवित आहे. मुलांचे पोषण करीत आहे. त्या भगिनीबरोबर या सुताचे माझे नाते जोडले जात आहे. नुसते व्याख्यानातून बंधूनो आणि भगिनींनो असे म्हणून काय उपयोग? त्यांच्या जीवनाशी नाते जडले पाहिजे."

**१९४२ चे चलेजाव आंदोलन**

१९४२ साली गांधीजींनी ब्रिटीशांना "चले जाव" चा आदेश दिला.तेव्हा मे मध्ये एस. एम.जोशी यांनी राष्ट्रसेवादलाच्या महाराष्ट्रातील १५० निवडक तरुणांचे गुप्त शिबीर घेतले. ८ ऑगस्टला चले जाव चा ठराव पास झाला. त्याच रात्री गांधी, नेहरुंसह अनेक नेत्यांना अटक झाली. तेव्हा जनतेने उघडपणे, भूमिगत राहून ब्रिटिशांविरुद्ध लढा दिला. त्यावेळी अच्युतराव पटवर्धन, अरुणा असफअली, डॉ. राममनोहर लोहिया आदी नेते भूमिगत झाले. या काळात एस.एम. यांची वाढलेली दाढी, पायजमा, शेरवानी आणि काळा गॉगल, जीना कॅप असा पोशाख यामुळे ते बोहरी मुसलमानासारखे दिसू लागले. इमामअली या टोपण नावाने स्वातंत्र्य चळवळीचे भूमिगत कार्यसुरु झाले. एस.एम.पूर्वी तुरुंगात उर्दू शिकले होते. त्यामुळे त्यांना वायव्य सरहद्द प्रांत आणि सिंधमध्ये पाठविण्यात आले. इमानअली हे टोपण नाव मुस्लीम पद्धतीची पोशाख आणि फर्ड्या उर्दूत बोलणे यामुळे एस.एम. उत्तर भारतात फिरत असतानाही पकडले गेले नाहीत. या आंदोलनातही त्यांनी भूमिगत राहून महत्वपूर्ण योगदान दिले.

**संयुक्त महाराष्ट्र चळवळ**

स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांनी राज्यकारभाराच्या सोईसाठी केलेले भारताचे बहुभाषिक इलाखे रद्द करुन भाषावार प्रांत रचना करुन नवीन प्रांतरचना व्हावी असे महाराष्ट्रातील काही नेत्यांना तीव्रतेने वाटू लागले. पण वर्तमान आणीबाणीच्या परिस्थितीत भाषावार प्रांत रचनेमुळे प्रादेशिक निष्ठा बळावतील आणि राष्ट्रनिष्ठेला तडा जाईल. म्हणून केंद्र सरकारने राज्यपुर्नरचनेस विरोध केला. त्याविरुद्ध महाराष्ट्रात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. शेवटी सरकारने भाषावार प्रांतरचना देण्याचे मान्य केले.पण मुंबई महाराष्ट्राला देण्याचे नाकारले. तेव्हा एस. एम.जोशी, श्रीपाद अमृत डांगे, प्र. के. अत्रे आदींनी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हावा ही मागणी आग्रहाने मांडली. एम.एम.जोशी त्यावेळी मुंबईचे विधानसभेचे सदस्य होते. तत्कालीन मुंबई राज्याचे मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनी मुंबईशिवाय महाराष्ट्र असा राज्यपुनर्रचनेचा ठराव मांडल्यावर एस. एम.जोशी उपसूचना मांडून मुळ ठरावाला प्रखर विरोध केला आणि मुंबई सह महाराष्ट्राची मागणी केली.

एस.एम.जोशी, श्रीपाद अमृत डांगे हे कामगार नेते होते. मुंबई महाराष्ट्राला असली पाहिजे. याचे एक मोठे कारण होते ते म्हणजे मुंबईत कामगार वर्ग मोठ्या प्रमाणात होता.मुंबई ही खरी कामगारांची आहे. ती कामगारांनी आपल्या कष्टाने निर्माण केली आहे. मुंबई कामगार वर्गामुळे ओळखली जाते. त्यात मराठी कामगारांची संख्या सगळ्यात जास्त आहे. त्यामुळे ती महाराष्ट्रात जाणे आवश्यक आहे अशी या नेत्यांची भूमिका होती. मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याच्या निर्णयामुळे मुंबईत असंतोषाचा भडका उडाला.

२९ मे १९५६ दादर स्टेशनजवळ मोठा जमाव प्रक्षुब्ध झाला होता. फुलांच्या करंड्या पटेवित होता. तेवढ्यात पोलीस इन्स्पेक्टर अडवाणी तेथे आले. पोलिसांची लॉरी पुढे येत होती. एस.एम.यांच्या लक्षात आले की जमाव अडवाणींना वेढू पाहतोय व तो त्यांना मारल्याशिवाय राहणार नाही. एस.एम. एकदम पुढे आले दोन्ही हात पसरुन त्यांनी अडवाणींना पाठीशी घातले आणि जमावाला उद्देशून म्हणाले, लोकहो, आधी मला ठार केल्यानंतरच तुम्ही त्यांच्या अंगाला स्पर्श करु शकाल. जमाव हे शब्द ऐकून थबकला. तेवढ्यात अडवाणी पोलिसांच्या लॉरीत बसू शकले. एस.एम.होते म्हणूनच त्यांचे प्राण वाचले. दुसऱ्या दिवशी देशभरच्या वर्तमान पत्रांनी एस. एम.जोशींनी इन्स्पेक्टर अडवाणींना वाचवले. ही बातमी ठळकपणे छापली. स्वतःचे प्राण धोक्यात घालायला तयार असणारा नेताच हिंसक जमावाला आवरु शकतो हे एस. एम.यांनी दाखवून दिले.

यशवंतराव चव्हाणांनी प्रतापगडावर छ. शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्याच्या अनावरणासाठी पं. नेहरुंना बोलावले. यावेळी एस. एम.यांनी या समारंभाविरोधी संयुक्त महाराष्ट्र समितीने निदर्शने करावीत अशी सूचना केली.समितीत याबाबतीत एकमत नव्हते. एस.एम. यांनी आपल्या भुमिकेवर ठाम राहून वाईला हजारो निदर्शकांची सभा घेवून लोकांना शांततापूर्ण निदर्शन करण्याची विनंती केली. नेहरु वाई पाचगणी मार्गाने प्रतापगडाकडे गेले. तेव्हा रस्त्याच्या दोन्ही बाजूला मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्र झालाच पाहिजे या घोषणा देत निदर्शने केली.

१९५६ला स्थापन झालेल्या संयुक्त महाराष्ट्र समितीचा सरचिटणीस म्हणून काम करताना सुरु केलेल्या सत्याग्रहात कम्युनिस्ट नेते कॉ. डांगे, अत्रे, यांसह १३ हजाराहून अधिक कार्यकर्त्यांनी सत्याग्रह करुन तुरुंगवास भोगला. मुंबईसह महाराष्ट्र मेळावा यासाठी लोकांनी प्राणाची बाजी लावली. १९५९ मध्ये समितीने अंतिम लढा सुरु करण्याचा निर्णय घेतला. विधानसभेवर मोर्चा आणायचा त्याचवेळी सभागृहातील सभा तहकूब करण्याचा प्रस्ताव मांडावयाचा आणि तो फेटाळला जाताच समितीच्या आमदारांनी सभात्याग करुन मोर्चात सहभागी व्हायचे ही एस. एम.यांची सूचना सर्वांनी मान्य केली.त्याचवेळी समितीतील कम्युनिस्टांनी एस. एम.यांना विरोध केला.तेव्हा न डगमगता म्हणाले, "सत्तासंपादन हे माझे उद्दीष्ट नसून मला संयुक्त महाराष्ट्र मिळवायचा आहे."

एस.एम.नी आंदोलनाला एक नैतिक दिशा दिली. सर्व विरोधी पक्षाची एकजुट करुन संयुक्त महाराष्ट्र संसदीय व सत्याग्रहाच्या मार्गाने खेचून आणला. शेकाप, प्रजा समाजवादी पक्ष, कम्युनिस्ट, रिपब्लीकन पक्ष अशा भिन्न विचारांच्या पक्षांना एकत्र घेवून जाण्याची तारेवरची कसरत एस. एम.जोशी करत होते. कारण सर्व पक्षांचा त्यांच्यावरचा विश्वास,

निःस्वार्थी भावना, प्रामाणिकपणा म्हणूनच आचार्य अत्रे यांनी एस (संयुक्त) एम (महाराष्ट्र) संयुक्त महाराष्ट्र जोशी असे समीकरण केले.

ज्यावेळी संयुक्त महाराष्ट्र मान्य झाला त्यावेळी संयुक्त महाराष्ट्र समितीच्या बैठकीत एस. एम.म्हणतात, आपली मागणी केवळ मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्र झाला पाहिजे. अशी नव्हती तर मुंबई, बेळगाव, कारवार, निपाणी, भालकीसह संपूर्ण महाराष्ट्र झाला पाहिजे. आणि याबाबत आपण तडजोड न स्वीकारता आपल्या संपूर्ण मागणीचा प्रश्न आताच निकाली लावावा. परंतु मागणीस समितीत पुरेसा पाठिंबा मिळाला नाही. एस.एम.जीव तोडून सांगत होते की, आपण या प्रश्नाचा निकाल आताच नाही लावला तर तो दीर्घकाळ लोंबकळत पडेल आणि सीमाभागातील आपल्या बांधवांना आपण विस्तापित केले असे होईल आणि पुढे तसेच झाले. महाराष्ट्र, कर्नाटक सीमाप्रश्न आजही डोकेदुखी बनला आहे.

**विद्यापीठ नामांतर लढा**

१९५८ साली मराठवाडा विद्यापीठाचा स्थापना झाली. विद्यापीठाच्या निर्मितीनंतर जवळजवळ २० वर्षांनी नामांतराची मागणी पुढे आली. औरंगाबाद येथे डॉ. आंबेडकरांनी जे शैक्षणिक कार्य मोठ्या प्रमाणात केले त्यांचे कृतज्ञतापूर्वक सतत स्मरण म्हणून मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असे करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली. नामांतराचा ठराव दोन्ही सभागृहात मंजूर झाला. त्याच दिवसापासून मराठवड्यात दंगल उसळली. तरीही एस. एम.आणि बापूसाहेब काळदाते औरंगाबादला पोहोचले तेव्हा लोकांनी त्यांना घेराव घातला.त्यावेळी झालेल्या शाब्दिक चकमकीत नामांतराचा ठरावाचा निर्णय तुम्हाला बदलावाच लागेल अशी मागणी करु लागले. तेव्हा एस. एम.म्हणाले नामांतराचा ठराव झाला याचा अर्थ कायदा झाला असे नाही.तसे विधेयक विधानसभेत किंवा विधान परिषदेत मांडले जाईल. त्यावेळी लोकशाही पद्धतीने दुरुस्ती करुन घेण्याची संधी मिळणार आहे. मग लोकांनी घेराव उठवला. दुसऱ्या दिवशी नामांतराच्या प्रश्नावर एस. एम. यांनी भूमिका बदलली अशा प्रकारची बातमी वृत्तपत्रात प्रसिद्ध झाली. त्याचबरोबर दलित पुढाऱ्यांचे म्हणणे होते की, एस. एम.यांनी अशा प्रकारची भूमिका घ्यायला नको होती.नामांतरवादीही एस. एम.यांना समजावून घेऊ शकले नाहीत.सर्वात निंदनीय घटना उदगीरला घडली.

दंगलग्रस्त गावांना भेटी देवून एस. एम.आणि पन्नालाल सुराना उद्गीरला प्रा.ना. य. डोळे यांच्याकडे आले. प्रा. डोळे एस. एम.यांना म्हणाले, काही विद्यार्थी तुम्हाला निवेदन देवू इच्छितात.तुम्ही ते घ्याल काय? एस.एम.यांनी होकार दिला.निवेदन देण्यासाठी दहा बारा मंडळी आली. त्यातील २ तरुण निवेदन देण्यास म्हणून त्यांनी कागद पुढे केले व चटकन एकाने पन्नालाल सुराना व दुसऱ्याने एस. एम. यांच्या गळ्यात जोड्यांची माळ घातली. नंतर एस. एम.यांनी त्यांना चांगलेच सुनावले.नंतर मुंबईला गेल्यावर त्यांनी वृत्तपत्रात दिलेल्या निवेदनात एस. एम.म्हणाले सरकारने मराठवाड्यातील दंगलीची न्यायालयीन चौकशी करावी. त्या चौकशीत या दंगलीला मी जबाबदार आहे हे असे ठरले तर देहांत शासनही भोगण्यास मी तयार आहे. नामांतराबाबत एस. एम. म्हणतात,खरे तर नामांतर म्हणजे सामाजिक परिवर्तनाच्या वाटचालीतील मनोमिलाप घडवून आणण्याचे एक पाऊल आहे आणि केवळ विद्यापीठाच्या नावाची पाटी बदलणे एवढेच महत्व

त्यास नाही. त्याहीपेक्षा व्यापक अर्थ यात आहे हे समजण्यास पटवून देण्याची गरज आता निर्माण झाली आहे.याबाबत एस. एम.म्हणतात, या नामांतर प्रकरणात परिवर्तन न झाल्याचे एकतरी उदाहरण दाखवा असे कोणी म्हटले तर ते आव्हान मी आता सहज स्विकारेन. १९८० साली मुंबईत नामांतराच्या प्रश्नावर मोर्चा निघून सत्याग्रह व्हावयाचा होता.आझाद मैदानापासून मोर्चासाठी सत्याग्रही आले होते.तेथे मैदानावर कोणीतरी तरुणाने पायाला स्पर्श करुन मला नमस्कार केला. मी त्याला कोण, कुठले विचारल्यावर तो म्हणाला ओळखलं नाहीत मला? मीच तो उद्‌गीरला आपल्या गळ्यात जोड्यांची माळ घालणारा. आता मी तो पुर्वीचा उरलो नाही.त्या कृत्याचा मला पश्चाताप झाला. आज मी नामांतराच्या लढ्यातील एक सत्याग्रही म्हणून उदगीरहून येथे आलो आहे. त्याच ते मनापासून उच्चारलेले शब्द मराठवाड्यात आयुष्यातील सर्वात मोठा पराभव मी पत्करला ही गोष्ट खरी असली तरी पराभवाच्या मिठ्ठ काळोखात अशी तेजस्वी पणती यथाशक्ती प्रकाश देण्याचे काम करीत आहे ती काही कमी समाधानाची बाब नव्हे.

**लढवय्या सेनापती**

१९६२ च्या चुरशीच्या लढाईत एस. एम.यांचा पराभव झाला.त्यांच्या पराभवामुळे महाराष्ट्रातील समाजवादी कार्यकर्त्यांना फार दुःख झाले. निवडणुकीच्या निकालानंतर समाजवादी पक्षाच्या प्रांतीक कार्यकर्त्यांच्या बैठकीच्यावेळी एस. एम.मात्र नेहमीप्रमाणे उत्साही व आनंदी होते. ते कार्यकर्त्यांना म्हणाले राजकारणात यशाने हुरळून जाता कामा नये, आपण समाजवादी समाजरचना व्हावी म्हणून झगडतो आहोत. समाजवादी न्यायासाठी आपण सुरु केलेली लढाई चालूच राहिली पाहिजे. बैठकीच्या शेवटी खानदेशातील लोढूभाऊ फेगडे म्हणाले. एस.एम.आणि मी फैजपुर काँग्रेसपासूनचे दोस्त. एस.एम.निवडणुकीत पडल्याचे समजताच डोळ्यात पाणी आले. पुण्याच्या मतदारांचा संताप आला. ज्या माणसाने संयुक्त महाराष्ट्र मिळवून देंण्यासाठी प्राण पणाला लावले. त्याची मतदारांना कदर नाही. पण आज एस. एम.यांचे भाषण ऐकले.मी आता पुन्हा जोमाने कामाला लागणार ते फैजपूर काँग्रेसमधील एक आठवण सांगताना लोढूभाउ म्हणतात,एका गावात लोकांनी आमची हुर्यो केली मी निराश झालो, एस. एम.मात्र जोमात होते. एस.एम.म्हणाले लोढू भाऊ, चल पुढच्या गावात लोक आपली वाट पहात असतील आणि तसंच झालं. त्यावेळी आणि आजही मला कळलं की आपला हा सेनापती कधी रणांगण सोडणार नाही. तेव्हा एस. एम.नी जे सांगितले तेच मी आज सांगतो. लढाई हरली म्हणून थांबायचं, पळायचं नसतं कारण आपल्याला युद्ध जिंकायचं असत आपण निवडणुकीची लढाई आज हरलो आहोत पण समाजवादाचं युद्ध जिंकणार आहोत. कारण आपला सेनापती आहे एस. एम.जोशी.

**राजकारणी संत**

१९६७ मध्ये एस.एम.जोशी लोकसभेच्या निवडणुकीत निवडून आले. १९६७ मध्ये त्यांनी लोकसभेची निवडणुक जिंकली. यावेळी इं. गांधी राष्ट्रपती पदासाठी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार म्हणून संजीव रेड्डी यांच्या विरोधात व्ही. व्ही.गिरी यांना उभे केले. यात एकेक मत महत्वाचे होते.इं. गांधींच्यावतीने बाबू जगजीवन राम एस.एम. यांना भेटायला आले. ते एस. एम.ना म्हणाले, तुमच्यासारख्या चारित्र्यवान नेत्यांची काँग्रेसला गरज आहे. ते म्हणतात की इंदिराजींनी

सांगितले आहे की, तुम्ही कॉंग्रेसमध्ये येवून कॉंग्रेसला सुधारु शकता आणि कॅबिनेट मंत्री होवून आपले योगदान देवू शकता. यावर एस. एम. यांनी हसत हसत उत्तर दिले की, मी अजूनपर्यंत स्वतःच्या पक्षाला सुधारु शकलो नाही तर कॉंग्रेससारख्या मोठ्या पक्षाला कसे सुधारु शकेन? इंदिराजीना सांगा की, माझे मत अवश्य व्ही.व्ही.गिरींना मिळेल, पण त्यासाठी कॉंग्रेसमध्ये ¾ãñ¥³¼ãäÞãäė गरज नाही.एस.एम.यांचा पुत्र अभय जोशी म्हणतात, तेच साने गुरुजींचे खरेखुरे अनुयायी होते.राजकारणाच्या दलदलीत राहून ते कमळासारखे सुंदर, स्वच्छ आणि तजेलदार राहिले. सानेगुरुजी जर आधूनिक महाराष्ट्राचे क्रांतिकारी संत होते तर एस. एम.आधुनिक महाराष्ट्राचे राजकारणी संत होते.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील अग्रणी नेते, लोकशाही मुल्यांवर अढळ निष्ठा ठेवणारे स्वातंत्र्यसैनिक, समाजवादाचे पुरस्कर्ते जनसामान्यांच्या प्रश्नावर संघर्ष करणारे कृतीशील क्रांतीकारी नेते असे विविध पैलू साथी एस. एम. जोशी यांच्या व्यक्तीमत्वात आढळतात. त्यांच्यासारख्या महान जननायकाच्या कर्तृत्वाची दखल आपण योग्य त्या प्रमाणात घेतली नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यांच्यासारखा प्रखर देशभक्ती असलेल्या व लोकशाहीचा खंदा पुरस्कर्ता असलेल्या चारित्र्यसंपन्न व सुसंस्कृत नेत्याच्या विचारांची व कर्तूत्वाची ओळख नव्या पिढीला करुन देण्याची गरज आहे. बेगडी देशप्रेम वाढलेले असताना राजकारणातली मुल्यहिनता फोफावली असताना, लोकशाहीचे चारही खांबांना कमकुवतपणा आला असताना एसएम अण्णांचा विचारांची प्रस्तुतता महत्वाची वाटते. त्यांच्यासारख्या समर्पित भावनेने राष्ट्र व समाजासाठी झोकून देऊन काम करणाऱ्या संघर्ष शील नेत्याचा विचार टिकवून ठेवणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

**संदर्भ सूची**


१. जोशी एस.एम : मी-अेस.अेम, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे : तृतीयावृत्ती-२००३

२. प्रधान, ग.प्र., महाराष्ट्राचे शिल्पकार एस. एम.जोशी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई. नोव्हेंबर २००४

३. दैनिक महाराष्ट्र टाइम्स, २७ एप्रिल २०१०, महाराष्ट्राचे दिनविशेष पुरवणी, मुंबई महाराष्ट्राचीच..., पान नं.०२

४. दैनिक तरुण भारत, ४ मे २०१०, किरण ठाकुर, संयुक्त महाराष्ट्राचे शिल्पकार आणि सीमाप्रश्न, पान नं. ०५

५. दैनिक लोकसत्ता, ३० मार्च २०१४, जोशी, अभय, आधुनिक महाराष्ट्राचे राजकीय संत

६. दैनिक प्रहार, १ मे २०१४, महाराष्ट्र दिन विशेष पुरवणी खांडके प्रकाश, हा अस्मितेचा हुंकार, पान नं.०७